# मावळते वर्षे 2022 चा धावता आढावा.....

31/12/2022

मावळत्या वर्षाचा आढावा घेताना सर्वप्रथम आपल्या आयुष्याच्या शेवट पर्यंत संघटनेच्या कार्यात सक्रिय असलेल्या सदस्या कै.जयश्री सास्विहळ्ळी ह्या 9 डिसेंबर 2022 रोजी आपल्या सर्वांचा निरोप घेऊन स्वर्गवासी झाल्या. त्यांचे दिवंगत पती व मानवतावादीचे संस्थापक सदस्य अन्ना सास्विहळ्ळी यांच्या निधना नंतर कै.जयश्री सास्विहळ्ळी यांनी भारतीय मार्शल आर्टचे उत्कृष्ट खेळाडू व सध्या स्टेट बँक ऑफ इंडिया व अन्यत्र उच्चस्थानी कार्यरत असणाऱ्या आपल्या तिन्ही मुलांना अरूणा,अमर, अश्विनी यांना संघटनेचे सदस्य करून घेतले. दिवंगत सदस्या कै. जयश्री सास्विहळ्ळी व संघटनेतील इतर सदस्यांच्या कुटुंबातील यावर्षी निधन पावलेल्या व्यक्तींना मी संघटनेच्या वतीने आदरांजली व्यक्त करतो. दिवंगतांच्या कुटुंबांच्या दुःखात संघटना सहभागी आहे.

आपले आजीव सदस्य सर्वश्री रोहिदास एकाड, बाळासाहेब बारवकर व विश्वास तांबे यांनी 2021-22 साली उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरी केल्याबद्दल तर श्री अभय पाटील यांना समाज सुधारक कै. शैलाताई रतन माली, बचपन बचाव समिती, घरट प्रकल्प पुणे द्वारा संयुक्तपणे राष्ट्रीय, सामाजिक व शैक्षणिक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच आपले सदस्य व राष्ट्रीय किर्तीचे तबलावादक पंडित पांडुरंग मुखडे यांना धनंजय थोरात यांच्या स्मरणार्थ दिले जाणारे कार्यकर्ता पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. डॉ.अजय बापूसाहेब सोनवणे यांना फ्रान्स येथे आयोजित करण्यात आलेल्या international conference मध्ये मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. आपली फिल्म मेकर सदस्या सनोबरखान हिला मुंबई इंडिया फिल्म फेस्टिव्हल 2022 चा क्रांतिकारी फिल्म मेकर हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आला तर श्रीमती माधुरी गुजर यांना वर्षभर गोरगरिबांना वस्त्र वाटपा चे काम केल्या बद्दल समाज प्रबोधन चैरिटिबल ट्रस्ट धनकवडी कडून प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या सर्वांचा संघटनेला निश्चितच अभिमान वाटतो. सर्वांचे मनापासून अभिनंदन..

दुसरा उपक्रम म्हणजे दसरा सणानिमित्त पुणे च्या बुधवार पेठेतील देवदासींच्या (वेश्यांच्या) मुलांना शालेय शिक्षणासाठी लागणारी सामग्री व आभूषणे (मुलींना) वाटप करुन एक आगळा वेगळा उपक्रम श्रीमती रजणी

दाणी यांनी पार पाडला. वैयक्तिकरित्या सत्तरी ओलांडताना पर्वतीवर झालेल्या हेरिटेज वॉक स्पधेत भाग घेऊन 15 मिनिटांत 108 पाय-या चढण्याचा कौतुकास्पद उपक्रमही त्यांनी नोंदविला. त्यांचेही हार्दिक अभिनंदन .

31 डिसेंबर 2021 अखेर संघटनेची सभासद संख्या 150 होती. कोविड 19 व इतर नैसर्गिक आजाराने 12 सभासद निधन पावल्याने आज 31 डिसेंबर 2022 अखेर सभासद संख्या 138 आहे. ही संख्या वाढण्यासाठी सर्व सभासदांना/हितचिंतकांना माझी नम्र विनंती राहिल की त्यांनी आपल्या कुटुंबातील कमीत कमी एक सदस्याला संघटनेचे सभासद करून घ्यावे. 31 डिसेंबर 2021अखेर संघटनेची बँकेत शिल्लक असलेली रक्कम 229270/- व मुदत ठेव 00/00- तर आज 31 डिसेंबर 2022 अखेर बँकेत शिल्लक असलेली रक्कम 174050.10 व मुदत ठेव 150,000/- आहे. 31 डिसेंबर 2021 अखेर इमारत निधी 8000/- तर 31 डिसेंबर 2022 अखेर 56297/- अशी आहे. 2022 अखेर पर्यंत विविध आश्रमाच्या भेटीत झालेला सर्व खर्च वजा जाता वरील रक्कम संघटने कडे जमा आहे. संघटनेचे विधी सल्लागार व अंतर्गत हिशोब तपासणीस अॅड.श्रीनिवास नंबियार हे मागिल अनेक वर्षा पासून संघटनेसाठी मोफत सेवा देत आले आहेत. आपले व आपल्या घरांतील मंडळींचे वाढदिवस सुध्दा ते संघटने मार्फत विवीध आश्रमांना अन्नदान तसेच महिना भर पुरेल असे धान्य व किराणा वस्तूंचे वाटप करून साजरा करतात. त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहे. सचिव अशोक जाधव व त्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना भक्कम साथ देणारे कार्यकारिणीचे सर्व सदस्यांचा मी अत्यंत आभारी आहे. या सर्वांनी एकजुटीने केलेल्या कष्टाचे फळ म्हणजे संघटनेची 28 वर्षाची ही यशस्वी वाटचाल... आपल्या सर्वांच्या नैतिक व कृतीशील पाठिंब्या मुळे संघटना नैसर्गिक, अनैसर्गिक संकटात सापडलेल्या जीवांना तसेच विविध आश्रमात जाऊन तेथील आश्रितांना आर्थिक, बौद्धिक तथा मानसिक आधार देण्याचे काम मागिल 28 वर्षा पासून सातत्याने पार पाडीत आहे. या वर्षी आपण पांच विविध आश्रमांना भेटी देऊन अन्नदान केले.

शरीरा पेक्षा मनाने खचलेल्या लोकांचे मनोधैर्य वृध्दी साठी काम करणे हे संघटनेचे मुख्य ध्येय आहे व त्या दिशेने संघटना वाटचाल करीत आहे. आपले कांही सदस्य आजारी आहेत. त्यांच्या उत्तम स्वास्थ्यासाठी आपण प्रार्थना करू या. निस्वार्थ भावनेने आपण देत असलेल्या सहकार्या बद्दल मी आपल्या सर्वांचा मनापासून आभारी आहे. नूतन वर्ष 2023 आपणां सर्वांना सर्वार्थाने आरोग्यदायी व आनंदमयी जावो हीच मनापासून शुभेच्छा. धन्यवाद धन्यवाद धन्यवाद गफ्फारखान पुणे.